सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/११/२०११

ठराव क्रमांक :- ९६१०

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य मैनुद्दीन शमशुद्दीन बागवान यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या मिरज विभागातील लोणी बाजार म्हणून गेली ५० वर्षापासून भाजी व फळ विक्रेते व्यवसाय करीत होते. मा.न्यायालयाच्या आदेशाने सदर लोणी बाजार मधील भाजी व फळ विक्रेत्यांना सदर ठिकाणाहून हटविण्यात आल्याने भाजी विक्रेत्यांचा व्यवसाय बंद होवून त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न गंभीर बनला आहे. भाजी विक्रेत्यांचा कुटूंब व त्याचा उदरनिर्वाह या व्यवसायावर असल्याने त्यांचे पुनर्वसन करणेबाबत शासनाचे धोरण असून व महापालिकेचे आद्य कर्तव्य आहे.

महापालिकेच्या मिरज विभागातील किल्ला भागातील जागा भाजी मंडईसाठी प्रस्तावित असून, सदर भागात भाजी मंडई होण्यासाठी महापालिकेकडून निविदा व इतर अनुषंगिक कार्यवाहीसाठी बराच अवधी लागणार असल्याने याकामी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करणेबाबत आदेशीत करणेस तसेच, दरम्यानच्या काळात लोणी बाजार मधील विस्थापित भाजी व फळ विक्रेत्यांना मिरज येथील पर्यायी जागा तातडीने देण्यास मान्यता देणेकामी विषयांकित आलेला प्रस्ताव असून, सभागृहात सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज लोणी बाजार मधील विस्तापित भाजी व फळ विक्रेत्यांना मिरज खंदकातील जागा देणेसाठी प्रशासनाने तातडीने निविदा प्रसिद्ध करावी. तसेच, याकामी पर्यायी जागेचा तोडगा काढण्यासाठी मिरजेतील सर्व नगरसवेकांची बैठक घेवून पर्यायी जागा निश्चित करावी दरम्यान मिरज वैरण बाजार येथे या विक्रेत्यांची तात्पुरती व्यवस्था तेथील वैरण व्यापाऱ्यांची गैरसोय अथवा अडचण होणार नाही याची योग्य ती दक्षता घेवून व त्याठिकाणी बाजारासाठी जागा देता येत असले तर त्याची पहाणी करुन प्रशासनाने व्यवस्था करावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

प्रभाग अधिकारी सूचक :- Kerron

प्र. क्र. ४

सदरचा ठराव

मा. आयुक्तसाहेब अनुमोदक :-

यांचे निर्देशनास आणून

कार्यवाही केला.

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/११/२०११

ठराव क्रमांक :- १६८

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.रुबाबबी रफीक खतीब यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज येथील मनपा शाळा क्र.२५ व २६ या भागातील जेष्ठ नागरीक हाजी अब्दुल हमीद अब्दुल करीत खतीब यांनी या भागात शाळा सुरु करुन गोरगरीब लोकांचे मुलांना शाळेत घालणेस प्रबोधन करुन भागातील मुलांना शाळेची आवड निर्माण केली. मुलांना विद्येची गरज लक्षात घेवून शाळेची मंजूरी घेणे, शाळेचे बांधकाम करणे त्यासाठी पाठ पुरावा करणे यासाठी मोठे योगदान दिलेले आहे. त्यांचे कामाचा आदर्श या पुढेही भावी पिढीस उद्बोधक ठरावे यासाठी व्यवस्थापन कमिटीने एकमुखी सदर शाळांना हाजी अब्दुल हमीद अब्दुल करीम खतीब प्राथमिक शाळा असे नामकरण करणेचा ठराव करुन शिफारस केली आहे. मिरज येथील मनपा.शाळा क्र.२५ व २६ ला हाजी अब्दुल हमीद अब्दुल करीम खतीब असे नामकरण करणेकामी आलेल्या उपरोक्त प्रस्तावाबाबत सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या शाळा,चौक इत्यादिना नामकरण करणेबाबत राष्ट्रीय पुरुष, नेते सामाजिक कार्यकर्ते इत्यादींची नावे दिली जात असतात. खाजगी व्यक्तीचे नाव देताना त्या व्यक्तीचा पूर्व इतिहास तपासावा असा नियम आहे. तरी, याकामी महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना/हरकती मागवून त्याबाबतचा सविस्तर अहवाल प्रशासनाने सादर करावा असे ही सभा सूचित करीत आहे.

सूचक :- Kerzon

अनुमोदक :- Patil

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मा. उमेश व्यवस्थापक

सरस्या ठराव मा. आयुक्तसो यांचे निर्देशनास आणून कार्यवाही ठेवा.

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/११/२०११

ठराव क्रमांक :- १६८

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिकेने इको सिटी करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. सद्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये अंत्यविधीसाठी लाकूड,रॉकेल यांची सोय केली आहे. त्याचा खर्च भरपूर येत आहे. त्यामूळे पर्यावरणात ऱ्हास होत असलेने त्याऐवजी इको सिटी प्रकल्पानुसार लाकूड व रॉकेल ऐवजी शेणी (शेणकूट) याचा वापर केल्यास खर्च कमी येणार आहे. तसेच होणारे प्रदुषण ही थांबणार आहे. तरी, सदरचा विषय अतिशय गंभीर असलेने इको सिटी करण्यासाठी अत्यंत महत्वाचा आहे. यावर धोरणात्मक चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करणेत आली. त्यानुसार ही सभा खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये अंत्यविधीसाठी शेणी (शेणकुट) याचा वापर करणेकामी प्रशासनाने सविस्तर आराखडा व प्रकल्प अहवाल तयार करुन, सविस्तर अहवाल आगामी सभेपुढे सादर करावा व त्यानंतर त्याबाबत महासभेला निर्णय घेणे सोईचे होईल असे या सभेचे मत असून, त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही ठेवावी असे ही सभा सूचीत करीत आहे.

सूचक :- Kevron

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [signature]

महापौर,

वै.आ. अधिकारी
सदरचा ठराव मा.आयुक्तसो यांचे निर्देशनास आणून कार्यवाही ठेवा.

[signature]
महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/११/२०११

ठराव क्रमांक :- १७०

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.१६/११/२०११ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेच कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहर वाढीव व कुपवाड सुधार पाणी पुरवठा टप्पा -५ भाग-१ (वारणा उद्भव) ची रु.७९.०२ कोटी खर्चाची योजना केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहरांच्या पायाभूत सुविधांचा विकास करणेच्या युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत मंजूर आहे. या योजनेची कामे प्रगती पथावर असून, या कामासाठी १०% म्हणजे रु.७.९० कोटी इतका निधी महानगरपालिकेस भरावा लागणार आहे. आज अखेर या योजनेवर महापालिकेचा ४.२६ कोटी हिस्सा (लोकवर्गणी) धरुन सुमारे रु.३९.६७ कोटी इतकी रक्कम खर्च झाली आहे. शासन निर्णय तेविआ/२०१०/प्र.क्र.१३१/२०१०/नवि-४ मंत्रालय मुंबई दि.२५/१०/२०१० मधील तरतुदीनुसार तेराव्या वित्त आयोगाचे अनुदानाच्या रक्कमेतून शासनाने मंजुर केलेल्या पाणी पुरवठा योजनाकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी भरावयाची लोकवर्गणी म्हणून रक्कम भरता येईल असे विषयांकीत प्रस्तावात नमुद असून, युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत मंजूर व प्रगतीत असणाऱ्या सांगली शहर वाढीव व कुपवाड शहर सुधार पाणी पुरवठा योजनांचे लोकवर्गणीचे भरणेच्या रक्कमेसाठी मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे आदेश क्र.नपप्रस/तेविआ पहिला हप्ता/११-१२/दि.१७ ऑगष्ट २०११ ने वर्ष २०११-१२ करीता महानगरपालिकेस १३ वे वित्त आयोगाचे अनुदानातून प्राप्त रु.२,६४,०४,४२८/- मधून रु.१कोटी पाणी पुरवठा विभागाकडे वर्ग करणेस मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात आले आहे. त्याशी ही सभा सहमती दर्शवित असून, विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

कार्य-अभियंता पा.पु.
मुख्यलेखापाल

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/११/२०११

ठराव क्रमांक :- 907

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१७/११/२०११ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेच कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या सांगली येथील इंदिरानगर झोपडपट्टीच्या पश्चिमेकडील बाजूस मंजूर विकास योजनेतील स.नं.४४२ ही जागा आरक्षण क्र.९६ "डिस्पेन्सरी" या आरक्षणाने बाधित होते. सदर जागेवर महापालिकेची शाळा क्र.२० सद्यस्थितीमध्ये असून, उर्वरित जागा ही "डिस्पेन्सरी" या आरक्षणा मध्ये समाविष्ठ आहे. कलम २६(१) व कलम ३०(१) अन्वये प्रारुप विकास योजनेनुसार मंजूर विकास योजनेतील आरक्षण कायम असून, आरक्षण क्र.९६ ऐवजी आरक्षण क्र.१४५ असा बदल झाला आहे. ७/१२ उताऱ्यावर प्रशासक, सांगली नगरपालिका अशी नोंद असून, जागेचे क्षेत्र ४३००.००चौ.मी. इतकी आहे. महापालिका क्षेत्रासाठी मंजूर असलेल्या प्रचलित बांधकाम विकास व नियंत्रण नियमावलीमध्ये तरतुदीनसुार घरकुलांच्या सदनिकेस बांधकाम परवानगी दयावयाची झालेस इमारतीची सामासिक अंतरे उक्त नियमावलीतील तरतुदीनुसार ठेवणे आवश्यक आहे. त्यामध्ये सवलत दयावयाची झालेस शासनाच्या नगरविकास विभागकडील आदेश क्र.टी.पी.एस.११०७/अनौ.३६/प्र.क्र.१३५/०८/नवि.९ दि.२६/०४/२०१० नुसार घरकुल योजना घोषित झोपडपट्टीने बाधित जागेवर राबविणेची असल्यास प्रस्तावात येणाऱ्या सर्व आरक्षणाबाबत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा व पुर्नविकास) अधिनियम १९७१ कलम ३ झेड-५ (२) नुसार नियोजन मा.संचालक नगररचना महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या पूर्व मान्यतेने विकास योजना/प्रादेशिक योजना महापालिकेच्या मान्यतेने विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदी शिथील करु शकतील असे निर्देश दिले आहेत.

इंदिरानगर सांगली स.नं.४४३ येथे शासनाकडून झोपडपट्टीच्या जागेवर घरकुल योजना मंजूर असून, त्यास दि.२०/१०/२०११ अन्वये घरकुल बांधकाम परवानगी दिली आहे. विषयांकीत प्रस्तावात नमुद केलेली जागा इंदिरानगर घोषित झोपडपट्टीच्या पश्चिमेकडील बाजूची जागा महापालिकेच्या मालकीची असून, या जागेवर घरकुले बांधकाम करणेचा महापालिकेचा मानस आहे. सदर जमिनीवर घरकुल योजना राबविणेची झालेस प्रस्तावित जागेवरील मंजूर व प्रारुप कलम २६(१) व कलम ३०(१) अन्वये विकास योजनेतील "डिस्पेन्सरी" या आरक्षणाबाबत महापालिका क्षेत्रासाठी मंजूर असलेल्या प्रचलित बांधकाम विकास व नियंत्रण नियमावली तरतुदीनुसार घरकुलांच्या सदनिकेस आरक्षित जागेवर बांधकाम करणेसाठी सवलत दयायची झालेस मा.शासनाच्या नगरविकास विभागाकडील आदेश क्र.टी.पीएस/११०७/अनौ.३६/ प्र.क्र.१३५/०८/नवि.९ दि.२६/०४/२०१० नुसार घरकुल योजना घोषित झोपडपट्टीने बाधित जागेवर राबविणेस व प्रस्तावात येणाऱ्या सर्व आरक्षणाबाबत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा व पुर्नविकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ झेड-५(२) अन्वये मा.संचालक नगररचना महाराष्ट्र राज्य पूणे यांच्या पूर्व मान्यतेने विकास योजना/प्रादेशिक योजना विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदी शिथील करणेस ही सभा धोरणात्मक मान्यता देत आहे.

स.स.न.र.

उक्त शासन आदेशानुसार आरक्षणाबाबत मा.महासभेच्या धोरणात्मक मंजूरी प्रमाणे सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो पूर्व परवानगीसाठी मा.संचालक,नगररचना महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे पाठविणेस ही सभा सहमती दर्शवित आहे.

महापालिका सचिव
ली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/११/२०११

ठराव क्रमांक :- ९७२

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.१७/११/२०११ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेच कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील पाणी पुरवठा विभाग सांगली व मिरज कार्यक्षेत्रातील गुंठेवारी भागात ज्या-ज्या भागातील भूखंडधारक यांनी नियमितीकरणाचे प्रशमन शुल्क व विकास आकाराची रक्कम भरुन नियमितीकरणाचे प्रस्ताव सादर केले आहेत. अशा नागरिकांना नियमितीकरणाचे प्रमाणपत्र,प्रस्ताव सादर केल्याची पावती,इतर मिळकतीची कागदपत्रे,घरपट्टी पावती,करारपत्र,इतर अनुषंगिक कागदपत्रासह अर्ज सादर केलेनंतर नियमाप्रमाणे अनामत भरुन घेवून नविन पाण्याचे कनेक्शन देणेत येतात.

तथापि, नियमितीकरणासाठी प्रस्ताव दाखल न केलेल्या भूखंडधारकांना पाणी कनेक्शन देणेत येत नसल्याने, यापैकी पुरपट्टयात असलेल्या गूंठेवारी भागातील प्लॉट धारकांचा जीवनावश्यक बाब म्हणून रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर कायदेशीर हक्कास बाधा येणार नाही असे हमीपत्र घेवून पाणी कनेक्शन देणेबाबत मा.महासभेच्या मान्यतेने सप्टेंबर २०११ अखेर मुदतीपर्यत पाण्याचे कनेक्शन देणेत आले आहेत.

अद्यापि गुंठेवारी क्षेत्रातील भूखंडधारकापैकी आर्थिक परिस्थिती नसलेल्या प्लॉटधारकांनी महापालिकेकडे गुंठेवारी नियमितीकरणासाठी प्रस्ताव दाखल केलेले नाहीत. अशा नागरिकांना गुंठेवारी प्रस्तावाची अट शिथिल करुन पाणी क्नेक्शन देणेची मागणी होत आहे. महापालिकेकडून सार्वजनिक नळ देणेचे बंद केले आहे. पाणी ही अत्यावश्यक बाब असल्याने, त्या भागात नागरिकांची थेट पाणी कनेक्शन नसलेतरी त्यांचे मार्फत महापालिकेकडून होणाऱ्या पाणी पुरवठ्यापैकीच पाण्याचा वापर होत असतो.

सबब, नियमितीकरणासाठी प्रस्ताव दाखल न केलेल्या गुंठेवारी भूखंडधारकांना रु.१००/- स्टॅम्प पेपरवर प्रस्ताव दाखल करु देत असलेची हमी घेवून नियमानुसार शुल्क भरुन घेवून ग्राहकाच्या मागणी प्रमाणे पाणी कनेक्शन देणेस दि.३० नोव्हेंबर २०११ अखेर मुदतवाढ देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सदर विषयास अनुसरुन सन्मा.सदस्य रामू लक्ष्मण गवळी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

अ) सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागांतर्गत नागरिकांना पाण्याची बिले दिली जातात. त्यांच्याकडून वेळेत बिले व थकीत बिले वसुल होणेच्या दृष्टीकोनातून मा.महापौर पाणी पुरवठा उपभोक्ता योजना माहे ३१ मार्च २०१२ या कालावधीसाठी राबविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Kevalon

अनुमोदक :- Patil

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

कार्यकारी अभियंता (पा.पु.)
अ' च्या अनुषंगाने ठराव मा. आयुक्तांचे निदर्शनास आणून कार्यवाही करा.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका